माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल झालेला तक्रार अर्ज

रामाआ /तक्रार क्र. १७८/२०२२/कोल्हापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| तक्रारदार | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| अशोक बापू पाटील | नायब तहसिलदार, पन्हाळा उपविभाग कार्यालय, पन्हाळा, जि.कोल्हापूर | -- |

**तक्रार सुनावणी दिनांक -दि.१२/०१/२०२४**

तक्रारदार यांनी दि. २७/०६/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

"आयोगाने व्दितीय अपील क्र.५३३६+५३३७+५३३८/२०१७/कोल्हापूर मध्ये दि.०३/१२/२०२१ रोजी आदेश पारित केला. त्यामध्ये विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय कार्यालय, पन्हाळा जि,कोल्हापूर यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या कागदपत्रांचा अभिलेखात १ महिन्याच्या आत शोध घ्यावा. संबंधित अभिलेख आढळून आल्यास अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने माहिती विनामुल्य पुरवावी. शोध घेऊनही अभिलेख आढळ न झाल्यास तसे शपथपत्र विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी एक महिन्यानंतर अपिलार्थीस पुरवावी, तसेच शपथपत्र पुरविल्याची अपिलार्थींची पोच व शपथपत्राची प्रत आयोगाकडे सादर करावी. तद्नंतर वरिष्ठांनी संबंधितांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम-२००५ च्या तरतुदीनुसार योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी."

त्यामध्ये दि. १२/०१/२०२४ रोजी सुनावणी आयोजित केली असता तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अस्लम जमादार व विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती सुरेखा गोरे हजर आहेत. तर तक्रारदार गैरहजर आहेत.

सुनावणीचे वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अस्लम जमादार यांनी सूचित केले की, आयोगाचा आदेश दि.२७/०६/२०२२ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर दि.०५/०७/२०२२ रोजी आयोगाचे आदेशानुसार प्रतिज्ञापत्र सादर केले. त्याची प्रत आयोगास सादर केली.

सुनावणी दरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अस्लम जमादार यांनी अपील आदेशाची अंमलबजावणी केली आहे. त्यामुळे तक्रारदाराचा तक्रार अर्ज निकाली काढण्यास पात्र आहे.

उपरोक्त पार्श्वभूमिवर आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश.**

तक्रारदाराचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे